उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार, ३ फेब्रुवारी, १९६५ | अंक ३

## विविध माहिती

**नेपाळला रशिआची मदत**—नेपाळमधील जनकपूर ह्या ठिकाणीं रशिआच्या मदतीनें सिगारेटस् तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यांत आला आहे. जनकपूर हें गांव भारतीय सरहद्दीच्या नजीक आहे. कारखाना सरकारी मालकीचा आहे. तो स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें तंबाखूची लागवडहि कारखान्यामार्फत हातीं घेण्यांत येणार आहे.

**लोखंडाच्या खाणींसंबंधीं मदत**—येत्या पंधरा वर्षांच्या काळांत भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या लोहखनिजाची २·५ कोटी टनांपर्यंत वाढ करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. परंतु ही योजना अमलांत आणण्यासाठीं लोखंडाच्या खाणींचा विकास होणें आवश्यक आहे. भारतामधील लोखंडाच्या खाणींच्या धंद्याचा पूर्णतया विचार करून सल्ला देण्यासंबंधीं सरकारनें दोन अमेरिकन कंपन्यांची नेमणूक केली आहे.

**बोटीवरील शवाची विल्हेवाट**—सागरांत प्रवास करणाऱ्या बोटीवर एखाद्याचा मृत्यु झाल्यास मयताची मरणोत्तर चौकशी करून शव समुद्रांतच सोडून देण्याचे अधिकार बोटीच्या कप्तानाला असतात. परंतु मयतानें आत्महत्या केल्याचा संशय असेल तर मात्र त्याचें शव पुढच्या बंदरांतील पोलिसांच्या ताब्यांत देण्यांत येतें अगर नातेवाईकांची मागणी आल्यास त्यांच्या हवालीं करण्यांत येतें.

**सीलोनच्या अधिकाऱ्यांना शिक्षण**—कोलंबो मदत योजनेला अनुसरून सीलोनमधील पोलाद धंद्यांतले दोन अधिकारी शिक्षण घेण्यासाठीं भारतांत आले आहेत. त्यांपैकी एक इंजिनिअर असून दुसरा विक्री विभागांतील आहे. विक्री विभागांतील अधिकाऱ्यानें ह्यापूर्वी भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत कामाचा अनुभव घेतलेला आहे.

**चवथ्या पंचवार्षिक योजनेंतील गुंतवणूक**—जर्मनीहून आलेल्या उद्योगपतींच्या व बँकवाल्यांच्या मंडळानें नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांची भेट घेतली. चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतानें मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांत मिळून ६,४०० कोटी रुपये भांडवल गुंतविण्याचें ठरविलें आहे अशी माहिती श्री. मेहता ह्यांनीं मंडळाला दिली.

**जंगलांच्या विकासाच्या योजना**—राज्य सरकारांनीं आपआपल्या स्वतंत्र जंगल विकासाच्या योजना आंखाव्या अशी सूचना भारत सरकारचे अन्न व शेतकीमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं केली आहे. तीन पंचवार्षिक कार्यक्रमानंतरहि भारताला दर साल २३ कोटी रुपयांचा जंगल खनिज माल आयात करावा लागतो. त्यामुळें अर्थातच परदेशीय चलनाचा व्यय होतो.

**दुर्गापूर येथील खताचा कारखाना**—पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री ह्यांच्या हस्तें दुर्गापूर येथें उभारण्यांत यावयाच्या खताच्या कारखान्याचा पायाभरणी समारंभ झाला. हा कारखाना भारतामधील खताच्या कारखान्यांपैकी सर्वांत मोठा होईल. कारखान्याची आंखणी, उभारणी व तो चालविण्याचें तांत्रिक ज्ञान ह्या सर्वच बाबतींत कोणत्याहि परदेशाची मदत घेण्यांत आलेली नाहीं. ह्या अर्थानें कारखाना १०० टक्के भारतीय बनावटीचा आहे.

**सुवर्णपदकांसाठीहि सोनें नाहीं**—कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगीं ५० विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विषयांत प्रावीण्य मिळविल्याबद्दल सुवर्णपदकें देण्यांत यावयाचीं होतीं. तथापि पदकांसाठी लागणारें सोनें मिळूं न शकल्यानें हीं पदकें त्या वेळीं देतां आलीं नाहींत. पारितोषिकें ठेवणाऱ्यांनीं सुवर्णपदकेंच देण्यांत यावीं अशी अट घातलेली आहे. विद्यार्थ्यांना सुवर्णपदकें नंतर देण्यांत येणार आहेत.

**लष्करी विषयांसाठी मासिक**—लष्करी विषयांना वाहिलेलें एक नवें मासिक मास्कोमध्यें प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलें आहे. ह्या मासिकाच्या इंग्रजी व फ्रेंच भाषेंतील आवृत्त्याहि प्रकाशित करण्यांत येतात. लष्करी विषयांची तात्त्विक व व्यावहारिक चर्चा मासिकांतून करण्यांत येते. शिवाय लष्करी शास्त्राच्या विकासाबद्दल माहितीहि देण्यांत येते.

**शरावती वीजकेंद्राची भव्यता**—म्हैसूर राज्यांतील शरावती जलविद्युतनिर्मिति केंद्राच्या भव्यतेविषयीं मध्यवर्ती पाटबंधारे खात्याचें मंत्री श्री. राव ह्यांनीं केलेला हिशेब असा आहे, हें केंद्र उत्पन्न करूं शकणारी वीज कोळशाच्या साह्यानें निर्माण करावयाची झाल्यास त्यासाठीं ३ कोटी टन वजनाचा कोळसा वापरावा लागेल. इतक्या कोळशाची किंमत सुमारें १२ कोटी रुपये होईल. म्हैसूर राज्यांतील वयांत आलेलीं सर्व माणसें जितकें काम करतील त्यापेक्षा अधिक काम शरावतीवरील वीज करूं शकेल.

**सलंग व लांब रेल्वेचे रूळ**—रेल्वेचे रूळ जोडतांना त्यांच्या दोन टोकांत थोडीशी फट मुद्दामच ठेवण्यांत येते. उष्णतेनें होणाऱ्या रुळांच्या प्रसरणास माया ठेवण्यासाठीं हें केलें जातें. परंतु अलीकडे सलंग व लांब रूळ वापरण्याची पद्धत पडूं लागली आहे. जर्मनींत तर दोन स्टेशनांमधील अंतर पुष्कळदा मैल मैल लांबीच्या रुळांनीं सांधलेलें असतें. रुळांचीं टोकें निमुळतीं करून तीं एकमेकांशीं पक्कीं जुळविण्यांत येतात. या पद्धतीनें गाडीला फार कमी हादरे बसतात.

**कम्युनिस्ट देशांची शिखरपरिषद**—मार्चच्या पहिल्या तारखेपासून कम्युनिस्ट देशांच्या प्रतिनिधींची शिखर परिषद् भरविण्यांत येणार आहे. परिषदेंत कम्युनिस्ट राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या मतभेदांचाच प्रामुख्यानें विचार होणार आहे. ह्या परिषदेंत चीन भाग घेणार नाहीं अशी वार्ता आहे. परंतु कांहीं अटींवर चीन परिषदेंत सहभागी होण्याची शक्यता दिसत आहे. कम्युनिस्ट चीननें व्हिएटनाम, मलेशिया, इत्यादि देशांत ज्या लष्करी कारवाया चालविल्या आहेत, त्यांना रशियानें पाठिंबा दिल्यास चीन परिषदेंत भाग घेईल असें म्हणतात. कोरिया आणि भारत ह्यांच्याविरुद्ध झालेल्या लष्करी कारवायांनाहि रशियानें पाठिंबा द्यावा असा चीनचा आग्रह आहे.

**औद्योगिक उत्पादनांत घट**—१९६४ सालांत भारताच्या औद्योगिक उत्पादनांत घट झाल्याचें आढळून आलें आहे. उत्पादन-वाढीची गति १९६४ च्या पहिल्या सहामाहींत ८·६ टक्क्यांवरून ६·२ टक्क्यांपर्यंत कमी झालेली आहे. मार्च ते जून ह्या काळांत उत्पादनांत विशेष घट झाली. कोळसा, लोखंडाचे खनिज, बिडाचें लोखंड, पोलादाचे ठोकळे, शिवणाचीं यंत्रें, विजेचे पंखे, वनस्पति तेल, इत्यादि मालाच्या उत्पादनांतील घट विशेष लक्षांत भरण्या-सारखी आहे.

**अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थी**—अमेरिकेंत अभ्यासासाठी गेलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या संख्येंत झपाट्यानें वाढ होत आहे. कांहीं वर्षांपूर्वी त्यांची संख्या ४ हजारांच्या जवळपास होती. एका वर्षापूर्वी त्यांची संख्या ६ हजारांपर्यंत आलेली आढळून आली. अगदीं अलीकडच्या माहितीप्रमाणें ७ हजार हिंदी विद्यार्थी अमेरिकेंत उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांपैकी बरेचजण पदवीनंतरच्या शिक्षणक्रमासाठी व तांत्रिक विषयांचा अभ्यास करण्यासाठी आलेले आहेत. कांहीं हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणा-नंतर अमेरिकन कंपन्यांत चांगल्या नोकऱ्याहि मिळतात.

**बुलढाणा जिल्ह्यांत साखरेचा कारखाना**—बुलढाणा जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्या-साठी सोयिस्कर जागा निवडण्याच्या हेतूनें मध्यवर्ती सरकारचें प्रतिनिधिमंडळ जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलें होतें. सिंदखेड राजा ह्या ठिकाणीं संकल्पित कारखाना काढण्याची सूचना करण्यांत आली आहे असें म्हणतात.

**राजस्थानांत लोकरीच्या गिरण्या**—राजस्थानच्या लघु उद्योग मंडळानें राज्यांत दोन लोकरीच्या गिरण्या काढण्याची योजना पक्की केली आहे. एक गिरणी लोकरीचे धागे काढणारी व दुसरी लोकर साफ करणारी आहे. धागे काढण्याच्या गिरणींत ४०० चात्या बसविण्यांत येतील. लोकरसफाईची गिरणी दरमहा २६ हजार पौंड लोकर साफ करूं शकेल. प्रत्येक गिरणीसाठी सुमारें १३ लाख रुपये खर्च येईल.

**जवानांसाठी कपडे**—हिंदच्या लष्करांतील जवानांसाठी लागणारें अनेक प्रकारचें कापड शहाजहानपूर येथील कापड-गिरणींत तयार करण्यांत येतें. ही गिरणी लष्कराच्या कारखान्यां-पैकींच एक आहे. भारतावर चीनचें आक्रमण झाल्यानंतर गिरणीच्या उत्पादनांत तिप्पट वाढ झालेली आहे. बर्फाचा प्रतिकार करण्यासाठी लागणारे खास कपडे व विमानांतून उडी टाकण्याच्या वेळीं लागणाऱ्या छत्र्यांचें कापडहि तेथें तयार होतें.

**बुलढाणा जिल्ह्यांतील गुदामें**—महाराष्ट्र सरकारनें बुलढाणा जिल्ह्यांत धान्याची साठवण करण्यासाठी ४ गुदामें बांधण्यास मंजुरी दिली आहे. ह्यांपैकी एका गुदामाचा पायाभरणी समारंभ कांहीं दिवसांपूर्वी पार पडला. ह्या गुदामासाठी २·६० लाख रुपये खर्च येणार आहे. सर्व गुदामांचें बांधकाम १९६५ च्या मार्च-अखेरपर्यंत पुरें होईल असा अंदाज आहे.

**केरळ राज्यांतील हिंवतापाचें उच्चाटन**—केरळ राज्यां-तून हिंवतापाच्या रोगाचें निर्मूलन करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. ह्यापुढें केरळमध्यें हिंवतापाचा प्रादुर्भाव झाल्यास तो बाहेरून आलेल्या माणसामुळें अगर डांसामुळें होईल. ह्या तापाचें निर्मूलन करण्याचें कार्य १४ आरोग्यरक्षक गटांकडे सोपविण्यांत आलें होतें. प्रत्येक गटाकडे १ लाख लोकवस्ती बंदोबस्तासाठी देण्यांत आली होती.

**नेहरूविषयक प्रदर्शन**—पुढील महिन्याच्या ९ तारखेस मॉस्को येथें पं. नेहरूंच्याविषयीं एक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत पं. नेहरू ह्यांनीं लिहिलेलीं व त्यांच्याविषयीं लिहिण्यांत आलेलीं पुस्तकें ठेवण्यांत येतील. १९५५ सालीं नेहरू रशियांत गेले असतां त्यांनीं रशियन लिपि शिकण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळीं त्यांनीं काढलेल्या रशियन लिपींतील सर्व अक्षरांचा एक तक्ता प्रदर्शनांत असेल.

**मनपसंत कपडे मिळणार**—रशिआंतील लोकांना आपल्या पसंतीचे कपडे मिळण्याचा योग आला आहे. आतांपर्यंत आर्थिक नियोजन करणाऱ्या संघटनेनें जे कपडे करण्याची मुभा ठेवलेली होती तेच कपडे लोकांना वापरावे लागत असत. ज्या दुकानांतून कपड्यांची व बुटांची विक्री प्रत्यक्ष गिऱ्हाइकांना होते त्या दुकानांकडूनच आतां कारखान्याकडे मागण्या नोंदण्यांत येतील.

**नेपाळला भारताची मदत**—नेपाळची औद्योगिक भरभराट घडवून आणण्याचें भारताचें धोरण चालूं राहील, अशी घोषणा नेपाळमधील भारताचे वकील श्री. श्रीमन्नारायण ह्यांनीं केली आहे. भारतानें नेपाळच्या आर्थिक विकासासाठी आतांपर्यंत सुमारें ३० कोटी रुपयांची मदत केलेली आहे. मदतीमागें राजकीय हेतु नाहीं.

**बरौनी येथील तेलशुद्धीचा कारखाना**—बरौनी येथील तेलशुद्धीच्या कारखान्याचा औपचारिक उद्घाटन समारंभ नुकताच झाला. कारखाना उभारण्याच्या कामीं रशिआ व रुमे-निआ ह्यांचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. ह्या सहकार्याचें स्मारक म्हणून तेथें २० फूट उंचीचा एक संगमरवरी स्तंभ उभारण्यांत आला आहे. कारखान्याची जास्तींत जास्त उत्पादनक्षमता ३० लाख टनांपर्यंत असेल. कारखान्याच्या परिसरांत रासायनिक उद्योग-धंद्यांची उभारणीहि करण्यांत येणार आहे.

**फोर्ड फौंडेशनची मदत**—अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशननें भारताच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत विकासाचीं अनेक कामें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. सघन शेती, कुटुंबनियोजन, कारखाने चालविण्याचें शिक्षण, आर्थिक संशोधन, इत्यादि स्वरूपाचीं कामें फौंडेशन करील. या विविध प्रकारच्या कामां-साठी २५ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**उत्तरप्रदेशांत तामीळचें शिक्षण**—उत्तर प्रदेश सरकारनें तामीळ भाषा शिकविण्याचीं १० केंद्रें राज्यांत स्थापन केलीं आहेत. शाळांतून तामीळ शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्यासाठी जरूर तर जादा वेतन देऊन तामीळ शिकविणारे शिक्षक नेमण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

# अर्थ

बुधवार, ३ फेब्रुवारी, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिमेंटच्या उद्योगधंद्यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना

सिमेंटच्या धंद्याची वाढ व विकास करण्यास मदत करण्यासाठी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या सरकारी मालकीच्या कंपनीची स्थापना करण्यांत आली आहे. कंपनी संपूर्णपणें भारत सरकारच्या अखत्यारांत राहील. हिंदमधील सिमेंटची मागणी सतत वाढत चाललेली आहे. पण त्या मानानें उत्पादन अपुरें पडत आहे. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस सिमेंटची मागणी २·५ कोटी टनाच्या घरांत जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ही मागणी पुरी करावयाची झाल्यास सिमेंटच्या उत्पादनांत फार मोठ्या प्रमाणावर वाढ होणें अत्यावश्यक आहे. सध्यां देशांतील सिमेंटचें उत्पादन १·१ कोटी टनाच्या आसपास आहे तें ३·७ कोटी टनांपर्यंत वाढवावें लागेल. खाजगी मालकीच्या सिमेंटच्या कारखान्यांबरोबरच सार्वजनिक मालकीचे कारखाने स्थापन करूनच ही गोष्ट साध्य होण्याची शक्यता आहे. सिमेंटच्या उत्पादनासाठीं लागणाऱ्या चुनखडीच्या दगडाच्या उपलब्धतेसंबंधीं अद्यापहि पुरेशी माहिती जमा झालेली नाहीं. त्यामुळें ह्या धंद्याच्या विकासांत अडथळे उत्पन्न झालेले आहेत. म्हणून कॉर्पोरेशन करणार असलेल्या कामांत चुनखडीच्या दगडाच्या खाणींचा शोध करण्यास विशेष महत्त्व देण्यांत आलें आहे. अशा प्रकारचें काम इतर कांहीं संघटना करीत आहेत. परंतु त्यांच्या कामांत एकसूत्रता नाहीं. ही एकसूत्रता आणण्याचें काम कॉर्पोरेशन करीलच; पण त्याशिवाय चुनखडीच्या खाणींचा शोध करण्याचें काम स्वतंत्रपणेंहि हातीं घेईल. सिमेंटच्या धंद्यांत अत्यंत महत्त्वाचें स्थान असलेल्या ह्या कच्च्या मालाबद्दल माहिती पुरविण्याचें काम कॉर्पोरेशन करणार आहे. त्यामुळें खाजगी मालकीच्या सिमेंटच्या कारखान्यांचा विस्तार करण्याच्या कामींहि कॉर्पोरेशनचें साह्य लाभूं शकेल. राज्य सरकारांनाहि कॉर्पोरेशन मदत करील.

## बोटी बांधण्याच्या साहित्याची आयात

बोटी बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणावर आयात करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील विशाखापट्टन् येथील कारखान्यांत बांधण्यांत येणाऱ्या प्रत्येक बोटीसाठी सुमारें ९० लाख रुपये किंमतीचीं यंत्रें व इतर साहित्य परदेशांतून आयात करावें लागतें. ह्या सामग्रीची आयात करावयाची म्हणजे परदेशीय चलनाच्या उपलब्धतेचा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. ब्रिटन व अमेरिकेकडून आयात करावयाची म्हटल्यास परदेशीय चलनाचा प्रश्न अधिकच बिकट होतो. म्हणून सरकारनें बोटी बांधण्यासाठी लागणारें व देशांत तयार न होणारें साहित्य हॉलंड, युगोस्लाव्हिआ, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड आणि बेल्झाम ह्या देशांतून आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. हे देश भारताला सवलतीच्या अटींवर कर्जे देण्यासहि तयार आहेत. सध्यां विशाखापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या कारखान्यांत दरसाल ३ बोटी तयार होऊं शकतात. १९६५ ते १९६८ पर्यंतच्या काळांत दरसाल सहा बोटी बांधण्याची व्यवस्था करण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत येणार आहे. अर्थात् विस्ताराची ही योजना टप्प्याटप्प्यानें अमलांत येईल. ह्या दृष्टीनें बोटी बांधण्याच्या गोदीचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. गोदीमधील निरनिराळ्या खात्यांची पुनर्घटना करण्याचा अभ्यास भारत सरकारच्या संरक्षण खात्यातर्फे चालूं झाला आहे. कारखान्याचा विस्तार करण्याच्या कामाबाबत तपशीलवार सूचना देण्यासाठी एका ब्रिटिश कंपनीचें साह्य घेण्यांत येणार आहे.

## काजू कमी खाण्याचा सल्ला

काजूंच्या उत्पादनाचा व निर्यात व्यापाराचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारच्या व्यापार खात्यानें एक मंडळ नेमलें होतें. ह्या मंडळानें अशी सूचना केली आहे कीं, काजूंच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी त्यांचा देशांतील खप निर्बंधित करण्यांत यावा. भारताला परदेशीय चलन मिळवून देणाऱ्या ज्या १० प्रमुख वस्तु आहेत, त्यांत काजूंचा समावेश आहे; आणि त्याचा क्रमांक दुसरा आहे. काजू आणि त्याच्या कवचापासून तयार केलेलें तेल ह्यांच्या निर्यातीमुळें १९६३–६४ सालांत भारताला २२·५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली. गेल्या १० वर्षांत काजूच्या निर्यातीच्या किंमतींत १०० टक्के वाढ झालेली आहे. जगांतील सर्व भागांत काजू अतिशय लोकप्रिय झालेला आहे. काजूनें घराघरांत, हॉटेलांत आणि मद्यालयांत प्रवेश मिळविला असून आपलें स्थान पक्कें केलेलें आहे. जागतिक बाजार-पेठांत, विशेषतः अमेरिका, पश्चिम युरोपांतील देश आणि रशिआ ह्या देशांतून काजूंच्या निर्यातीला अद्याप खूप वाव आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत काजूंच्या निर्यातीचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीनें ह्या देशांतून काजूचा खप होऊं शकेल. काजूगरांची निर्यात करण्याच्या कामीं भारताची मक्तेदारीच आहे. जगाच्या एकूण मागणीपैकी ९० टक्के गरज भारताकडून भागविली जाते. तथापि कच्च्या काजूंच्या पुरवठ्यासाठी मात्र भारताला बाहेरील आयातीवर अवलंबून राहावें लागतें. देशांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या १ लाख, ३५ हजार टन कच्च्या काजूंपैकी एकतृतीयांशच निर्यात केले जातात. ह्याचा अर्थ असा कीं, सुमारें ९० हजार टन काजू देशांतच खपतात अगर वायां जातात. म्हणूनच कच्च्या काजूंची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते.

## बंगालमध्यें विटांचे ४ मोठे कारखाने

गंगेच्या पात्रांतील गाळाचा उपयोग करून विटा तयार करणारे ४ मोठे कारखाने काढण्याचें पश्चिम बंगाल सरकारनें ठरविलें आहे. हे कारखाने यंत्राच्या साह्यानें चालणारे असून सर्व वर्षभर उत्पादन करूं शकतील. सर्व कारखाने गंगेच्या कांठींच काढण्यांत येणार आहेत. ते चालूं झाल्यावर दरसाल १२ कोटी विटा तयार करण्यांत येऊं लागतील. गेल्या कांहीं वर्षांत कलकत्त्याच्या आसपास असणाऱ्या विटांच्या कारखान्यांचें क्षेत्र वाढत चाललें आहे.

### घरगुती वापरासाठी नवें इंधन

नेवेली लिग्नाइट कॉर्पोरेशननें कमी प्रतीच्या कोळशाचा उपयोग करून घरगुती वापरासाठी एक नवें इंधन तयार केलें आहे. हा एक नव्या प्रकारचा कोळसाच म्हणण्यास हरकत नाहीं. मद्रास येथें भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनांत ह्या कोळशाचा उपयोग करून दाखविण्यांत आला. इंधनाला 'लेको' असें नांव देण्यांत आलें असून तें लवकरच बाजारांत विक्रीसाठी ठेवण्यांत येणार आहे. ह्या इंधनाचे गोळे लवकर पेटतात, व त्यांची उष्णता एकसारखी येत राहते. गोळ्यांनीं पेट घेतल्यावर धूर होत नाहीं अगर वासहि येत नाहीं. सध्यांच्या जळाऊ कोळशापेक्षा त्याची कार्यक्षमता २५ टक्के अधिक आहे. गोळे तयार करण्याची यंत्रसामग्री भारतांत आणण्यांत आली आहे. तिच्या साहाय्यानें दरसाल ३ लाख, ८० हजार टन वजनाचे गोळे तयार करतां येतील.

### मनःशांति मिळविण्यासाठी औषधांचा वाढता उपयोग

प्रगत मानण्यांत येणाऱ्या देशांतून मनःशांतीसाठी औषधाच्या गोळ्या घेण्याचें प्रमाण वाढत आहे आणि त्या घेण्याचा सल्ला डॉक्टरमंडळीच देत आहेत. निद्रानाश, मानसिक विषाद आणि भावनांचा आवेग ह्यांच्यामुळें क्षुब्ध झालेल्यांना हीं औषधें अधिकाधिक देण्यांत येत आहेत. त्याचबरोबर अशीं औषधें घेऊन आत्मघात करणारांची संख्याहि वाढत आहे. ब्रिटनमध्यें १९४१-५० ह्या कालांत अशा आत्मघातांची वार्षिक सरासरी १०४ होती. १९५८ ते ६२ ह्या कालांतील ही सरासरी ७३५ आहे. १९४३ पासून ब्रिटनमधील स्त्रियांत हीं विषारी औषधें घेऊन आत्महत्या करणारांची संख्या वाढत चाललेली आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांचें प्रमाण अधिक आहे. त्यांतहि ४५ ते ६४ वयाच्या दरम्यान असलेल्या स्त्रियांत आत्महत्येचें प्रमाण जास्त आहे.

### करमणुकीवरील कराच्या प्राप्तीमधील हिस्सा

स्थानिक स्वराज्य संस्थांना कराव्या लागणाऱ्या लोकहिताच्या कामासाठीं पुरेसा पैसा उपलब्ध असत नाहीं. त्यामुळें स्थानिक गरजा भागविण्याकडे कळत न कळत दुर्लक्ष होतें. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मध्यवर्ती मंडळानें ह्यासंबंधीं अशी सूचना केली आहे कीं, करमणुकीवरील कराचा कांहीं हिस्सा राज्य-सरकारांनीं स्थानिक संस्थांना द्यावा. परंतु बऱ्याच राज्यांच्या सरकारांनीं मंडळाच्या ह्या सूचनेला विरोध केला आहे. मोटारी-वरील कर आणि प्रवाशांवरील कर ह्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नां-तहि स्थानिक संस्थांना वाटा द्यावा अशी शिफारस मंडळानें केली आहे. कांहीं राज्यांतून मोटारीवरील कराच्या उत्पन्नांतून कांहीं हिस्सा स्थानिक संस्थांना देण्यांत येतहि आहे. करमणुकीवरील करांतील भाग देण्यास मात्र फारच थोड्या राज्यांनीं तयारी दाखविली आहे.

### सार्वजनिक मालकीचे सिमेंटचे कारखाने

भारतांत सिमेंटचा धंदा निघून ५० वर्षांचा काळ लोटला आहे. त्यानिमित्त मुंबई येथें समारंभ करण्यांत आला. त्या प्रसंगीं स्वागत-पर भाषण करतांना सिमेंट कारखानदार संघटनेचे अध्यक्ष श्री. धरमसी खटाव म्हणाले कीं, सार्वजनिक मालकीच्या विभागांत सर्वतोपरी नवीन सिमेंटचे कारखाने उभारण्याचें सरकारचें धोरण आहे. पण असे करण्यापेक्षा सध्यां चालू असलेल्या सिमेंटच्या कारखान्यांना विस्तार करण्यास उत्तेजन देणें आर्थिकदृष्ट्या परवड-णारें ठरेल. सिमेंटच्या उत्पादनाच्या क्षेत्रांत सार्वजनिक मालकीचा विभाग स्थापन करण्यापूर्वीं त्यासंबंधींच्या अर्थशास्त्राचा विचार करणें अगत्याचें आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ५० लाख टन अधिक सिमेंट तयार होईल.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी २५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.



## स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. २ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४५५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस
ग्लोव्हूज—इरेझर्स—ऑईल सील्स
व
स्वरूप केबल्स

## स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.
स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.
( टेलिफोन नं. : ५५२०१ )

## कुटुंबनियोजनासारख्या ज्वलन्त सामाजिक विषयावर कीर्तन करणारे
# डॉ. गोविन्द खरे

महाराष्ट्रांत कीर्तनाची परंपरा फार जुनी आहे. धर्मजागृति



करण्याच्या कामीं कीर्तनकारांनीं बहुमोल कामगिरी केली आहे. त्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत 'राष्ट्रीय कीर्तनकार' ही एक नवीन परंपरा सुरू झाली. राष्ट्रीय प्रवृत्ति समाजांत उत्पन्न करून राष्ट्राभिमानाची जोपासना ह्या कीर्तनकारांनीं केली. राष्ट्रपुरुषांचीं स्फूर्तिदायक चरित्रें आपल्या आख्यानांत सांगितलीं. परंतु समाजशिक्षण, जनता-जागृति, या दृष्टीनें कीर्तनाच्या माध्यमाचा योजकतेनें उपयोग करणारे पहिले उदयोन्मुख कीर्तनकार म्हणून डॉ. गोविन्द खरे ह्यांचा थोडक्यांत परिचय आम्ही करून देत आहों.

डॉ. गोविन्द खरे हे भाषा आणि वैद्यक ह्या दोन्हींचे पदवीधर असल्यानें 'आरोग्य', 'कुटुंबनियोजन', 'रक्तदान' यांसारख्या वैद्यकीय तांत्रिक विषयाला भाषालालित्याचा साज चढवून त्यांनीं कीर्तनाचें स्वरूप पार पालटून टाकलें आहे. कीर्तन म्हणजे एकपात्री नाटकच. अमोघ वक्तृत्व, सुंदर कल्पनाविलास, सुरेल संगीत, बहुश्रुतता, हजरजबाबीपणा, विनोदप्रचुरता, ह्या गुणांच्या जोडीला प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास, ह्यामुळें त्यांचीं कीर्तनें लोकरंजक व लोकप्रिय तर होतातच, पण लोकशिक्षणाचें कामीं उपयुक्तहि ठरतात. दिल्लीला हिन्दींतून, गोव्यांत आणि महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं मराठींतून त्यांनीं कीर्तनें केलीं. कांहीं कीर्तनें इंग्रजींतूनहि केलीं. 'विमायोजना', 'बचत योजना', अशा उपयुक्त विषयांवरहि त्यांचीं कीर्तनें झालीं आहेत.

पुणें येथें गेल्या महिन्यांत, कुटुंबनियोजन सप्ताहाच्या समारोपाचे दिवशीं, संभाजी पार्कमध्यें, त्यांचें कुटुंबनियोजनावरील कीर्तन उत्कृष्ट झालें. आटोपशीर परिवार असणाऱ्या विवेक शहाण्यांचा संसार कसा सुखाचा आणि समाधानाचा होतो आणि दशपुत्र्यांचा स्वतःचाच नव्हे तर त्यांच्या अष्टपुत्रे झालेल्या मुलामुलींचे संसार कसे उध्वस्त होतात आणि जन्म दिलेल्या अपत्यांवर कसा अन्याय होतो, ह्याचें त्यांनीं परिणामकारक विवेचन केलें. आपल्या छंदाचा समाजसेवेकडे उपयोग व्हावा, ह्या दृष्टीनेंच ते हेतुपुरःसर आपल्या कीर्तनांचा विषय निवडतात. आम्ही त्यांच्या उपक्रमांना सुयश चिंतितों.

## तिबेटमध्यें युद्धतयारीचा मोठा तळ

तिबेटच्या भूमीवरून उड्डाण करणाऱ्या अमेरिकन विमानांनीं मिळविलेल्या माहितीवरून असें आढळून आलें आहे कीं, तिबेटमध्यें चीननें मोठा युद्धतळ उभारण्याचें काम चालू केलें आहे. मोठ्या उंचीवरून विमानांतून खालीं उडी घेणारे हवाई सैनिक तेथें आणण्यांत आले आहेत. ह्या सैनिकांच्या छावण्या विखुरलेल्या आहेत. पूर्व नेपाळच्या उत्तरेला अशा दोन छावण्या असल्याच्या वार्ता आल्या आहेत. त्याशिवाय अग्निबाणांच्या प्रक्षेपणाचे तळही तिबेटमध्यें उभारण्यांत येत आहेत. चीन जवळ अणुबॉंब असला तरी तो वाहून नेणारे अग्निबाण अद्याप नाहींत. परंतु, येत्या चार पांच वर्षांच्या काळांत चीन ते तयार करूं शकेल. १९६२ सालीं चीनला तेलाचा तुटवडा जाणवत होता. परंतु आतां तेलपुरवठ्याची परिस्थिति सुधारली आहे. गेल्या दोन वर्षांत वायव्य चीनमध्यें बऱ्याच नव्या तेलविहिरी खोदण्यांत आल्या आहेत.

## रासायनिक खतांच्या वांटपाची व्यवस्था

हिंदी शेतकऱ्यांना पुरविण्यांत येणाऱ्या रासायनिक खतांच्या वांटप-पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी व्यावहारिक आर्थिक संशोधन संघटनेच्या राष्ट्रीय मंडळानें एका अभ्यासगटाची नियुक्ति केली होती. ह्या गटानें केलेल्या शिफारसी मंडळाचे अध्यक्ष डॉ. पी. एस. लोकनाथन् ह्यांनीं जाहीर केल्या आहेत. भारतामधील शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा अधिक प्रमाणांत वापर करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून खतांच्या किंमती, त्यांचें वांटप आणि त्यांच्या खरेदीसाठी देण्यांत येणारीं कर्जें ह्या सर्व बाबतींत फेरविचार झाला पाहिजे अशी शिफारस गटानें केली आहे. अभ्यासगटाला असें आढळून आलें कीं खतांच्या चढत्यावाढत्या किंमती, कर्जपुरवठ्याच्या अपुऱ्या सवलती आणि सदोष वांटपव्यवस्था ह्यांच्यामुळें खतांच्या वापरावर मर्यादा पडत आहेत. मध्यवर्ती खतसंचयाच्या पद्धतीनें नत्रयुक्त खतांच्या किंमती ठरवून देण्यांत आलेल्या आहेत. त्या कमी करतां येणें शक्य नसल्यास खतांच्या कारखानदाराला अगर व्यापाऱ्याला अगर शेतकऱ्याला किंमतींचा कांहीं भाग देण्यांत यावा. सुपरफॉस्फेट ह्या खताची खरेदी करण्यासाठी शेतकऱ्याला किंमतीच्या एक चतुर्थांशपर्यंत आर्थिक मदत देण्याची पद्धत चालू आहेच, नत्रयुक्त खतांच्या बाबतींतहि ती सुरू करतां येईल. खतांच्या वापराबद्दल बोलतांना डॉ. लोकनाथन् म्हणाले कीं, येत्या १० वर्षांत भारतामधील शेतीचें उत्पादन वाढलेंच पाहिजे. नाहींतर १९८० च्या सुमारास, कांहीं तज्ज्ञांनीं भाकित केल्याप्रमाणें, भारतांत फार मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडल्याशिवाय राहणार नाहीं. शेतीच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ करावयाची असेल तर खतांच्या वापराची गति खूप वाढविली पाहिजे. जपान, ब्रिटन, पश्चिम युरोप, ह्या देशांतून भरपूर खतें वापरून वाढत्या लोकसंख्येचा धोका टाळण्यांत आलेला आहे.

## १० लाख बेकारांची श्रमिक सेना उभारण्याची सूचना

नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांनीं उत्कल विद्यापीठाच्या २१ व्या पदवीदानप्रसंगीं बोलतांना महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारताचें स्वातंत्र्ययुद्ध देशाच्या उद्धाराला जाणीवपूर्वक वाहून घेतलेल्या अल्पसंख्य लोकांनीं जिंकलें; परंतु दारिद्र्याविरुद्ध चालू करण्यात आलेली मोहीम मात्र लक्षावधि लोकांनीं तींत भाग घेतल्याशिवाय जिंकतां येणार नाहीं. विधायक काम करणारी आणि अर्थनिर्मितीच्या साधनांचें जतन करणारी नागरिकांची मोठी सेनाच ह्या कामासाठी उभारली पाहिजे. ह्या सेनेची संघटनाहि देशाच्या गरजा भागवील अशा प्रकारची असली पाहिजे. भारतांत आज लक्षावधि लोक बेकार आहेत. त्यांच्यामधून १० लाख लोकांची एक श्रमिक सेना उभारण्यांत यावी. ५०० लोकांची एक एक तुकडी करण्यांत येऊन त्यांचेकडून ग्रामीण भागांतील विकासाचीं कामें करवून घेण्यांत यावीत. त्यांना साक्षर करण्यांत तर यावेंच; पण त्याचबरोबर कांहीं कौशल्याचीं कामेंहि शिकविण्यांत यावीत त्यांच्या सामाजिक जाणिवेचें क्षितिज विस्तारण्यांत यावें आणि सहकाराचीं मूलतत्त्वें त्यांना समजावून सांगण्यांत यावींत. हा शिक्षणक्रम दोन वर्षांचा असावा. श्रमिक सेनेंत दोन वर्षें काम केल्यावर त्यांना त्यांच्या पूर्वीचा जीवनक्रम अनुसरण्यास मुक्त करावें. दोन वर्षांच्या काळांत मिळालेल्या शिक्षणामुळें त्यांच्या मध्ये निकटचे दुवे उत्पन्न झालेले असतील. तुकड्या तयार करतांना त्या शेजारी शेजारी असलेल्या खेड्यांतून जमवाव्या. त्यामुळें ग्रामीण समाजांत बदल घडवून आणण्याची प्रक्रिया चालू होण्यास मदत होईल, व सामाजिक परिस्थिति बदलूं लागेल.

### जगांतील सर्वांत मोठ्या १०० बँका; त्यांत अमेरिकेच्या ३० आणि जपानच्या १७

जगांतील सर्वांत मोठ्या १०० बँकांची यादी पाहतां, त्यांत अमेरिकन बँका अग्रेसर दिसतात. त्या १०० बँकांपैकी ३० बँका अमेरिकन आहेत. फक्त एकच हिंदी बँक ह्या १०० बँकांच्या यादींत आहे, ती म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया. तिचा अनुक्रम ७८ वा लागतो. जगांतील सर्वांत मोठी बँक म्हणजे सॅन फ्रॅन्सिस्को (अमेरिका) येथील बँक ऑफ अमेरिका नॅशनल ट्रस्ट अँड सेव्हिंग्ज असोसिएशन. दुसऱ्या अनुक्रमाची बँक म्हणजे न्यूयॉर्कची चेस मॅनहॅटन बँक. न्यूयॉर्कच्या फर्स्ट नॅशनल सिटी बँकेचा अनुक्रम तिसरा आहे. ह्या तीनहि बँकांकडे प्रत्येकीं १०,५०,००,००,००० अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त ठेवी आहेत. लंडन येथील बार्कलेज बँकेचा नंतर अनुक्रम लागतो. त्याखालीं पुनः न्यूयॉर्कची मॅन्युफॅक्चरर्स हॅनोव्हर ट्रस्ट कंपनी, ही बँक येते. लंडनची मिडलंड बँक, न्यूयॉर्कची केमिकल बँक न्यूयॉर्क ट्रस्ट कंपनी, मॉंट्रिअलची (कॅनडा) रॉयल बँक ऑफ कॅनडा, टोरोंटोची (कॅनडा) कॅनेडिअन इंपीरिअल बँक ऑफ कॉमर्स, न्यूयॉर्कची मॉर्गन गॅरंटी ट्रस्ट कंपनी, अशा बँकांचा त्याखालीं अनुक्रम आहे. जगांतील सर्वांत मोठ्या १०० बँकांपैकीं बहुसंख्य अमेरिका आणि युरोप खंडांतील आहेत. जपानच्या मात्र १७ बँकांचा जगांतील पहिल्या १०० बँकांत समावेश होतो.

### स्टेट बँक ऑफ इंडियाचे नवे मॅनेजिंग डायरेक्टर

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या जागीं श्री. एन. रामानंदराव ह्यांची नेमणूक झाली आहे. ते ४६ वर्षांचे आहेत. ऑगस्ट, १९६४ पासून त्यांच्या ह्या नेमणुकीपर्यंत ते बँकेच्या मुंबई लोकल हेड ऑफिसचे सेक्रेटरी आणि ट्रेझरर होते.

### मध्यप्रदेश बँकेचा अग्रहक्काचा दावा फेटाळला
#### लक्ष्मी बँकेच्या लिक्विडेटरचें कृत्य योग्य


"मध्य प्रदेश स्टेट को. बँकेच्या हरदा आणि बेतुलगंज ह्या शाखांनीं लक्ष्मी बँकेच्या यवतमाळ, खांडवा आणि छिंदवाडा ह्या शाखांकडे रु. ११, २८०·५६ चीं बिलें वसुलीसाठी पाठविलीं होतीं. त्या बिलांची रक्कम वसूल करून लक्ष्मी बँकेच्या मुंबई आणि बेतुल ह्या शाखांवर डिमांड ड्राफ्ट काढून धाडण्यांत यावीं अशी सूचना दिलेली होती. ह्या सूचनेनुसार डिमांड ड्राफ्ट पाठवतांच लक्ष्मी बँकेचें एजंटचें नातें संपुष्टांत आलें. मध्यप्रदेश स्टेट को. बँक आणि लक्ष्मी बँक ह्यांचें नातें फक्त घेणेकरी आणि देणेकरी एवढेंच उरलें. तेव्हां आपल्या येण्यास अग्रहक्क मिळावा, हा मध्यप्रदेश बँकेचा दावा लक्ष्मी बँकेच्या लिक्विडेटरनें फेटाळला हे योग्यच केलें." मुंबई हायकोर्टांत मध्यप्रदेश बँकेनें केलेल्या अपिलाचा न्यायमूर्ति मोदी ह्यांनीं लिक्विडेटरच्या बाजूनें निवाडा करतांना वरीलप्रमाणें उद्गार काढले.

### एअर इंडियाचा नफा

एअर इंडिया इंटरनॅशनलला १९६३–६४ मध्यें ३·८४ कोटी रुपये ठोक नफा उरला. १९६२–६३ मध्यें तो ३·४५ कोटी रु. होता. उतारूंच्या वाहतुकींत २०·६% वाढ झाली.

### कुटुंबनियोजनासाठी ९५ कोटी रु.

चवथ्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमासाठी ९५ कोटी रु. राखून ठेवण्यांत येतील. जरूरीप्रमाणें ती तरतूद १२५ कोटी रु. पर्यंतहि वाढविली जाईल. १७ कोटी रु. संततिप्रतिबंधक साधनांसाठी असून ८·५ कोटी रु. संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियांसाठी आहेत.

## " कृषि औद्योगिक समाजरचने " ची वाटचाल

देशांतील अप्रगत व ग्रामीण भागांत लहान लहान उद्योग-धंद्यांच्या प्रसाराच्या बाबतींत सर्वत्र विचारविनिमय चालू झालेले आहेत. या बाबतींत जपान देशाचें उदाहरण फारच स्पृहणीय आहे.

जपानमधील उद्योगधंद्यांची पाहणी करून नुकतेच परत आलेले महाराष्ट्रांतील एक कार्यकर्ते, श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या जपान-मधील उद्योगधंद्यांच्या त्यांनीं केलेल्या पाहणीच्या हकीगतीचा गोषवारा "अर्था"च्या ता. १६ डिसेंबर, १९६४ च्या अंकांत आलेला आहे. सदर हकीगतीवरून जपानमधील एकूण सर्व कारखान्यांच्या संख्ये-मध्यें लहान धंद्यांचें प्रमाण ९९ टक्के पडतें असें सांगण्यांत आलें आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारनें अप्रगत भागांत उद्योगधंद्यांची वाढ होण्याकरितां पुष्कळच सवलती दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्यामुळें ग्रामीण भागांत लहान लहान उद्योगधंद्यांची वाढ होण्यास उत्तेजन मिळेल. देऊं केलेल्या अनेक सवलतींमध्यें महत्त्वाची सवलत म्हणजे " अप्रगत भागांत कोणते धंदे सुरू केले असतां ते फायदेशीर होतील याचें संशोधन करण्यास उद्योगपतींना जो खर्च येईल त्या खर्चापैकी ७५ टक्के खर्च सरकार देईल. "

वरील सवलतीशिवाय, तांत्रिक शिक्षण देणें, वीज, पाणी-पुरवठा, वगैरे बाबतींत बऱ्याच सवलती दिल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

### शेतीस प्रोत्साहन

वरीलप्रमाणें उद्योगधंद्यांचें प्रमाण ग्रामीण भागांत वाढल्यानें शेतीच्या व्यवसायासहि प्रोत्साहन मिळेल. उद्योगधंद्यांच्या वाढी-करितां करण्यांत येणाऱ्या सोई म्हणजे उदाहरणार्थ, रस्ते, वीज, पाणीपुरवठा, वगैरेंचा फायदा शेतकऱ्यांसहि मिळूं लागल्यानें शेती-बद्दल जास्त आस्था उत्पन्न होऊन उत्पादनाच्या पैदाशींतहि वाढ होऊं शकेल. शेतीशीं संबंधित असे जोडधंदे ( दुधाचें उत्पादन, कुक्कुटपालन, वगैरे ) निघण्यास पुष्कळच अवसर मिळेल.

नुकतेच, दुर्गापूर येथें भरलेल्या काँग्रेसच्या विषयनियामक समितींत, ग्रामीण भागांत उद्योगधंदे सुरू होण्याबद्दल विचार-विनिमय झाला. त्यांतहि खालीलप्रमाणें विचार मांडण्यांत आले:—
" देशांत शेतीवर लोकसंख्येचा वाढता बोजा पडत आहे तो कमी करण्यासाठी प्राक्रिया करणारे उद्योग ग्रामीण विभागांत काढण्यांत यावे. "

वरील सर्व हकीगतविरून लहान उद्योगधंदे ग्रामीण भागांत काढण्याच्या बाबतींत सर्वत्र लक्ष लागू लागलें आहे हें फारच महत्त्वाचें आहे. या योजनेमुळें " कृषि औद्योगिक समाजरचना " निर्माण करण्याकडे वाटचाल होऊं लागेल. ——वा. कृ. कोगेकर

---

### मळ्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जें

चहा, कॉफी, रबर, ह्यांच्या मळ्यांना व्यापारी बँकांकडून दीर्घ मुदतीचीं कर्जें मिळण्याची व्यवस्था करणारी योजना तयार करण्यांत आली आहे. ॲग्रिकल्चरल रिफायनॅन्स कॉर्पोरेशननें भरविलेल्या एका बैठकींत योजना ठरविण्यांत आली. बैठकीसाठी मळ्यांचे व बँकांचे ५० प्रतिनिधि आले होते. ह्या प्रसंगीं बोलतांना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. भट्टाचार्य म्हणाले कीं, व्यापारी बँकांनीं शेतीच्या विकासाविषयीं आस्था दाखविणें अतिशय जरुरीचें आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेविषयीं बँकांना तळमळ वाटते कीं नाहीं, हेंच त्यांच्या वागणुकीनें सिद्ध होणार आहे. बैठकींत कर्जें देण्याची पद्धत, तारण आणि कर्जें देण्यासाठी बँकांना जरूर असणारी तांत्रिक माहिती मिळण्याची व्यवस्था ह्याविषयीं चर्चा झाली.

सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?




प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई.

**गव्हाची विक्री स्थगित**—फ्रान्सकडून चीन १० लाख टन गहूं विकत घेणार होता. ह्या व्यवहारासाठी उभयता देशांत चालूं असणाऱ्या वाटाघाटी स्थगित करण्यांत आल्या आहेत. फ्रान्सनें सांगितलेल्या किंमती चीनला पटल्या नाहींत. फ्रान्सनें रशियाला ३ लाख, ३० हजार टन गहूं विकण्याचा करार पूर्ण केला आहे. त्यामुळें चीनला गव्हाची विक्री करण्यास फ्रान्स फारशी उत्सुकता दाखवीत नाहीं.

**शास्त्रज्ञांची अदलाबदल**—शास्त्रीय संशोधकांच्या भेटी-परतभेटीसंबंधीं संयुक्त-अरब-प्रजासत्ताक आणि भारत ह्यांनीं कांहीं कार्यक्रम आंखला आहे. ह्या कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें प्रजासत्ताकांतील ६० शास्त्रज्ञ भारताला भेट देतील आणि तितकेच भारतीय शास्त्रज्ञ ईजिप्तला जातील. पदार्थविज्ञान, जीवरसायन, अन्नशास्त्र, आहारशास्त्र, वैद्यक, इत्यादि विषयांतील शास्त्रज्ञांची उभयता देशांत देवाणघेवाण होईल.

**पोलंडकडून आणखी मदत**—वीजनिर्मितीचीं केंद्रें उभारण्यासाठी पोलंडनें भारताला आणखी १०·५ कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. कर्जाचा उपयोग करून भारत पोलंडकडून प्रत्येकीं १२५ मेगॅवॅट वीज निर्माण करूं शकणारे दोन जनरेटर्स व इतर यंत्रसामग्री विकत घेणार आहे. पोलंडनें भारताला दिलेलें हे तिसरें कर्ज आहे. ह्यापूर्वी देण्यांत आलेलीं दोन कर्जे २९·८ कोटी रुपयांचीं आहेत. त्यांचा उपयोग मुख्यत: कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठीं करावयाचा होता.

**पंजाब रेल्वे पुलाची बांधणी**—गेल्या महिन्यांत भारताच्या दक्षिण किनाऱ्याजवळ धनुष्यकोडी येथें झालेल्या सागरी वादळामुळें रामेश्वर बेट मुख्य भूमीशीं जोडणारा रेल्वेचा पूल वाहून गेला. हा पूल पुन्हा बांधण्यासाठी ४० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. तथापि कामासाठी लागणाऱ्या मोठ्या लोखंडी तुळ्या मिळविणें जरा वेळाचें काम आहे. बांधकामासाठी लागणारी सामग्री हाताशीं आल्यावरहि पूल पुरा होण्यास एक वर्षाचा अवधि लागेल. पंजाबपासुन धनुष्यकोडीला जाणारा रेल्वेमार्ग पुन्हा बांधण्यास ६० लाख रुपये खर्च येईल. उध्वस्त झालेला पूल एका आयरिश इंजिनियरनें ५० वर्षांपूर्वी बांधलेला होता.

**हिंदी कापडाची पीछेहाट**—किनियामधील कापडाच्या बाजारपेठेंत पाकिस्तानांतून येणाऱ्या कापडानें हिंदी बनावटीच्या कापडाला शह देण्यास प्रारंभ केला आहे. पाकिस्ताननें अलीकडे एका अद्ययावत् कापडाच्या गिरणीची आयात करून उत्तम प्रकारच्या कापडाच्या उत्पादनास सुरुवात केली आहे. त्याशिवाय पाकिस्तानमधील कापड गिरण्यांना, निर्यातीसाठी खास सवलतीहि देण्यांत येत आहेत. परिणामी, त्यांची स्पर्धेची शक्ति वाढली आहे.

**धनिक करचुकार सर्वत्रच असतात**—जगप्रसिद्ध सिनेमानटी सोफिआ लॉरेन ही रोममधील प्राप्तिकर भरणाऱ्या लोकांत तिसऱ्या क्रमांकाची आहे. तिला ३५ कोटी लिरा उत्पन्नावर कर द्यावा लागणार आहे. परंतु तिनें जाहीर केलेलें उत्पन्न मात्र ३ कोटी लिरा होतें. प्राप्तिकर भरणारे पहिले दोन इटालिअन नागरिक सरदार घराण्यांतील आहेत. करआकारणी खात्यानें त्यांचें करपात्र उत्पन्न अनुक्रमें ५० कोटी लिरा व ३७·५ कोटी लिरा धरलेलें आहे. त्यांनीं स्वतः मात्र ५ कोटी लिरा व ३ कोटी लिरा एवढेंच उत्पन्न दाखविलेलें आहे.


प्रगतीचा आणखी एक टप्पा

२६ जानेवारी १९६५ च्या शुभमुहुर्तावर अल्पबचत योजना आकर्षक व्याजाच्या दरानें सुरु करीत आहोंत हें जाहीर करण्यास अत्यानंद होत आहे. सर्वांनीं या बचत योजनेंत भाग घेऊन सहकार्य द्यावें.

अल्पावधींत आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली
आणि
उत्तरोत्तर प्रगतिपथावर असलेली

# जनता सहकारी बँक लि. सांगली.

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )

फोन नं. २४४ | रजि. नं. १४०९८ | पोस्ट बॅग नं. ९८

शाखा— मार्केट यार्ड — ( फोन ४८४ )

प्रगतिपथावरील बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रू. | ५,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रू. | २,३७,५५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रू. | ७६,१५५ |
| एकूण ठेवी | रू. | १७,८५,४०० |
| एकूण खेळतें भांडवल | रू. | ४०,६८,४०० |

संपूर्ण सेवा ] खास वैशिष्टचें [ संपूर्ण सुरक्षितता

ज ] आकर्षक व्याजाच्या दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

न ] बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ता ] बँक सुरुवातीपासूनच २ टक्के डिव्हिडंड देत आली असून सुरुवातीपासून ' अ ' वर्गांत आहे.


एम्. एस्. कराळे, चेअरमन

एस्. एस्. पांड्याजी — मॅनेजर

आमदार वसंतरावजी पाटील — व्हा. चेअरमन



महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

## — न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.